# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजूला उस्मानपुरा

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email: roaurangabad@dtemaharashtra gov.in


**परिपत्रक**

**जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०२०/** 106

**दिनांक** 07 JAN 2020

प्रति,

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद

उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद,जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मनाबाद,बीड,पु.ला.शां.तं.लातूर,

निवासी महिला शासकीय तंत्रनिकेतन,लातूर.

**विषयः- राज्य शासकीय कर्मचारी यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दि. ८ जानेवारी, २०२० रोजी पुकारलेल्या देशव्यापी लाक्षणिक संपाबाबत..**

**संदर्भः-** सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संघटना-१५२०/प्र.क्र.०१/१६-अ, दि. ६ जानेवारी,२०२०

उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकान्वये आपणास कळविण्यांत येते की, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र कर्मचा-यांच्या विविध मागण्यांसंदर्भात दि. ०८ जानेवारी, २०२० रोजी देशव्यापी संप करणार असल्याची नोटीस शासनास दिली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ यांनी देखील सदर संपास पाठिंबा दर्शविला आहे. सदर संपामध्ये राज्य शासकीय-निमशासकीय अधिकारी / कर्मचा-यांसोबत स्वायत्त संस्थेच्या इतर संघटनांचे सदस्यही सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. **सरकारी-निमसरकारी कर्मचारी - राज्य कर्मचारी मध्यवर्ती संघटनेस महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम क्र.२९ खाली शासन मान्यता नाही.**

तरी आपल्या संस्थेतील अधिकारी / कर्मचा-यांची संपात भाग न घेण्याविषयी व नेहमीप्रमाणे कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करावा तसेच कार्यालय प्रमुखांनी संप काळात आपले मुख्यालय सोडू नये. कार्यालय प्रमुखांनी या आदेशाच्या दिनांकापासून लाक्षणिक संप संपेपर्यंत कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांची कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करू नये आणि जे अधिकारी / कर्मचारी रजेवर असतील अशा प्रत्येक प्रकारणी विचार करून त्यांची रजा रद्द करून त्यांना तात्काळ कामावर बोलवावे किंवा कसे ते ठरवावे. यासोबत सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक ०६ जानेवारी २०२० चे शासन परिपत्रक जोडण्यात येत असून त्याचे अवलोकन व्हावे.

सदर संपाच्या दिवशी संस्थेत उपस्थित असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची माहिती आपल्या संस्थेतील विभाग प्रमुख यांच्याकडून दि. ०८.०१.२०२० रोजी सकाळी संकलित करून, संपाबाबतची माहिती **खालील विहीत प्रपत्रात सकाळी ११.०० वाजेपर्यंत या कार्यालयास ई-मेलवर अचूक पाठवावी.** जेणेकरून सदर माहिती संचालनालयास वेळेत सादर करणे सुलभ होईल.

**प्रपत्र ब** **दिनांक ०८ जानेवारी, २०२०**

| संवर्ग | अधिकारी/कर्मचा-यांची एकूण (संख्या) | पुर्व परवानगीने रजेवर असलेले अधिकारी / कर्मचारी (संख्या) | संपात सहभागी झालेले अधिकारी /कर्मचारी (संख्या) | कार्यालयात उपस्थित असलेले अधिकारी / कर्मचारी (संख्या) |
|---|---|---|---|---|
| गट-अ व ब | | | | |
| गट-क | | | | |
| गट-ड | | | | |
| एकूण | | | | |

**(महेश शिवणकर)**

**प्र.सहसंचालक,**

**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

**प्रतः- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी.**

MISC/2019

**राज्य शासकीय कर्मचारी यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दि. ८ जानेवारी, २०२० रोजी पुकारलेल्या देशव्यापी लाक्षणिक संपाबाबत .....**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संघटना-१५२०/प्र.क्र.०१ /१६-अ**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ६ जानेवारी, २०२०

**परिपत्रक**

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी दि.०८ जानेवारी,२०२० रोजी देशव्यापी लाक्षणिक संप करण्याची नोटीस शासनास दिली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ यांनी देखील सदर संपास पाठिंबा दर्शविला आहे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम क्र.६ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यास संप करण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक ) नियम, १९७९ मधील नियम क्रमांक २९ खाली राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र हया संघटनेला मान्यता देण्यात आली नसून ती शासन मान्यता प्राप्त संघटना नाही. तरीही सदर देशव्यापी संपामध्ये राज्यातील शासकीय-निमशासकीय कर्मचारी सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. दि.०८ जानेवारी, २०२० रोजीच्या संप कालावधीत शासनाचे कामकाज सुरळीतरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभाग/तसेच त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांना पुढे दर्शविल्याप्रमाणे उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत:-

अ) शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांनी संपामध्ये सहभागी होणे, ही बाब गैरवर्तणूक समजण्यात येईल व अशा कर्मचा-यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारचे आदेश विनाविलंब निर्गमित करण्यात यावेत व ते सर्व कर्मचारी यांच्या व्यक्तीश: निदर्शनास आणावेत. तसेच त्या आदेशाची प्रत शासनाच्या प्रत्येक विभाग/कार्यालय यांच्या सूचना फलकावर लावण्यात यावी.

ब) कर्मचाऱ्यांनी संपात सहभागी न होता, नेहमीप्रमाणे कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करावा.

क) संप काळात कार्यालय नियमित वेळेवर उघडण्याची व बंद करण्याची योग्य ती व्यवस्था करावी व ती व्यवस्था जबाबदार अधिकारी यांचेकडे दयावी. आवश्यकता भासल्यास गृहरक्षक/पोलिस दलाची मदत घ्यावी.

ड) विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी संप काळात आपले मुख्यालय सोडून जावू नये.

इ) विभागप्रमुखांनी /कार्यालय प्रमुखांनी या आदेशाच्या दिनांकापासून संप संपेपर्यत कोणत्याही शासकीय कर्मचा-यास कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये आणि जे कर्मचारी रजेवर असतील अशा प्रत्येक प्रकरणी विचार करुन त्यांची रजा रद्द करुन त्यांना कामावर तात्काळ बोलवावे किंवा कसे ते ठरवावे.

ई) शासकीय कर्मचा-यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे "काम नाही वेतन नाही" हे धोरण राज्य शासनही अनुसरत असल्याचे कर्मचा-यांना अवगत करावे.

फ) ज्या शासनाच्या सेवा महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा अधिनियमांतर्गत घोषित करण्यात आल्या आहेत अशा सेवांबाबत कर्मचाऱ्यांना अवगत करावे. जे कर्मचारी संपावर जातील त्यांच्याविरुध्द सदर अधिनियमांतर्गत कार्यवाही करण्यात यावी.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये संप काळात अत्यावश्यक व इतर सेवा सुरळीत चालू राहतील याबाबत उपाययोजना कराव्यात.

५. सदर संप कालावधीमध्ये कार्यालयात उपस्थित असलेल्या कर्मचारी यांची माहिती क्षेत्रिय कार्यालयांनी त्यांचेशी संबंधित मंत्रालयीन विभागांना कळवावी व मंत्रालयीन विभागाने त्यांच्या विभागाची माहिती दुपारी १२.०० वाजेपर्यत व अधिपत्याखालील कार्यालयांची संकलित माहिती दुपारी २.०० वाजेपर्यंत या परिपत्रकासोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात कार्यासन १६-अ, सामान्य प्रशासन विभाग, नवीन प्रशासन भवन, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे सादर करावी. तसेच ईमेल पत्ता udaysinh.chouhan@nic.in या ई-मेलवरही अचूक पाठवावी. यापूर्वी असे निदर्शनास आले आहे की, कर्मचारी यांच्या उपस्थितीची कार्यालयनिहाय माहिती विहित वेळेवर उपलब्ध करुन देत नाहीत. तेव्हा यावेळी काळजीपूर्वक सदर माहिती विहित कालमर्यादेत देण्याची व्यवस्था करावी.

६. सर्व विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागातील व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात संपाच्या कालावधीत उपस्थितीची माहिती दुपारी १२.०० वाजेपर्यंत या विभागाकडे अचूक पाठवावी. तसेच संपाच्या कालावधीतील उपस्थितीची टक्केवारी दुपारी १२.०० वाजेपर्यंत या विभागाकडे अचूक प्राप्त होईल अशाप्रकारे पाठवावी.

७. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२००१०६१५३३०८०६०७ हा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SHIVAJI RAGHUNATH DAUND

Digitally signed by SHIVAJI RAGHUNATH DAUND
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=b99a2e19d25d8a33bf92aacc08f1abf37c100141f30d445bb4f9eaf5acb6e718, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=e08a9964fa88914fd0b0956696e822b221982cc926ec215f4b3ac3db9582d97e, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHIVAJI RAGHUNATH DAUND
Date: 2020.01.06 17:04:50 +05'30'

**( शिवाजी दौंड )**

**सचिव (सा.वि.स.), सामान्य प्रशासन विभाग,**

**महाराष्ट्र शासन**

**सोबत :-प्रपत्र**

**प्रति,**

१. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद /विधान सभा, महाराष्ट्र, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

२. सर्व सन्माननीय विधान परिषद /विधान सभा व राज्यातील संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई ३५.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
९. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१०.प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
११.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१२.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१३.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई ३२
१४.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई ३२
१५.प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान परिषद), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
१६.प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान सभा ), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
१७.सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई ३२
१८. महासंचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई ३२ (५ प्रती )
त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रक प्रसिध्दीसाठी पाठवावे.
१९.सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
२०.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका, महाराष्ट्र राज्य
२१.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२२.राज्यातील सर्व महामंडळे,मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२३.उपसचिव, (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई ३२
२४.विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
२५.सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती)
२६.निवड नस्ती (कार्यासन १६-अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

## प्रपत्र - अ

मंत्रालयीन विभाग /प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांची संप कालावधीतील उपस्थितीबाबतची माहिती

दुपारी १२.०० वाजता/ दुपारी २.०० वाजता

**मंत्रालयीन विभाग-..................** दि. ०८ जानेवारी, २०२०

गट -

| संवर्ग | एकूण अधिकारी /कर्मचाऱ्यांची (संख्या) | | पूर्व परवानगीने रजेवर असलेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) | | संपात सहभागी झालेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) | | कार्यालयात उपस्थित असलेल्या अधिकारी/कर्मचारी (संख्या) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विभागा-अंतर्गत | क्षेत्रिय कार्यालय | विभागा-अंतर्गत | क्षेत्रिय कार्यालय | विभागा-अंतर्गत | क्षेत्रिय कार्यालय | विभागा-अंतर्गत | क्षेत्रिय कार्यालय |
| गट व संवर्ग निहाय | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | |

## प्रपत्र-ब

क्षेत्रिय अधिका-यांनी त्यांच्याशी संबंधित मंत्रालयीन विभागांना परस्पर पाठविण्याबाबतची माहिती

**क्षेत्रिय कार्यालयाचे नाव .................** **जिल्हा-...................**

**त्यांचे मंत्रालयीन प्रशासकीय विभाग- ..............** दि. ०८ जानेवारी, २०२०

**गट -**

| गट व संवर्ग निहाय | एकूण अधिकारी/कर्मचारी **(संख्या)** | पूर्व परवानगीने रजेवर असलेले कर्मचारी **(संख्या)** | संपात सहभागी झालेले कर्मचारी **(संख्या)** | कार्यालयात उपस्थित असलेले कर्मचारी **(संख्या)** |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| एकूण | | | | |

## प्रपत्र – क

विभागीय आयुक्त कार्यालय तसेच त्यांच्या अधिपत्याखालील महसूली कर्मचाऱ्यांसह अन्य सर्व शासकीय कार्यालयातील जिल्ह्यांतील कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबतची माहिती.

**विभागीय आयुक्त-** दि. ०८ जानेवारी,२०२०

गट -

| अ.क्र. | विभागीय आयुक्त | एकूण अधिकारी/ कर्मचा-यांची (संख्या) | पूर्व परवानगीने रजेवर असलेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) | संपात सहभागी झालेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) | कार्यालयात उपस्थित असलेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) |
|---|---|---|---|---|---|
| | जिल्हा | | | | |
| १. | खुद्द | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |
| **एकूण** | | | | | |

-----XXXXXX-------